# UNIT 4
# J. KRISHNAMURTI
# जे. कृष्णमूर्ती

## 1. सत्य - पथहीन प्रदेश.
## 2. ज्ञातापासून मुक्ति.
## 3. शिक्षणविषयक दृष्टिकोन



## Jiddu Krishnamurti

(May 11, 1895 – February 17, 1986) an Indian writer and speaker on philosophical and spiritual subjects. His subject matter included: psychological revolution, the nature of the mind, meditation, human relationships, and bringing about positive change in society.
He constantly stressed the need for a revolution in the psyche of every human being and emphasized that such revolution cannot be brought about by any external entity, be it religious, political, or social.

## प्रस्तावना :

कृष्णमूर्ती अथवा जे. कृष्णमूर्ती या नावाने प्रसिध्द असलेल्या जिद्दू कृष्णमूर्तीचा जन्म एका तेलगू भाषिक वेलानाडू उपजातीच्या ब्राह्मण कुटुंबात आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यातील मदनपल्ली येथे झाला. ते त्यांच्या आईवडिलांचे आठवे अपत्य असल्याने त्यांचे नाव ईश्वराचे असावे, यो हेतूने त्यांचे नाव 'कृष्ण' असे ठेवण्यात आले.त्यांचे कुटुंब जिद्दू या खेड्यातील होते. दक्षिण भारतात नावापूर्वी जन्मगावाचे नाव लिहिण्याची पध्दत असल्याने 'जिद्दू कृष्णमूर्ती' असे त्यांचे नाव पडले. त्यांच्या मातापित्याचे नाव संजीवम्मा-नारायणय्या होते. नारायणय्या सनदी नोकर होते. सारे कुटुंब धार्मिक होते.

कृष्णमूर्तीचा अल्पसाही परिचय थिऑसॉफीकल सोसायटी (Theosophical Society) शिवाय पूर्ण होवू शकत नाही.1875 मध्ये या आध्यात्मिक संघाची स्थापना झाली. इंग्लीशमधील Theos चा अर्थ ईश्वर आणि Sophia चा अर्थ ज्ञान (प्रज्ञान). त्यापासून Theosophy - 'ईश्वरशास्त्र' हा शब्द बनतो. या संघटनेचे तिचे आंतराष्ट्रीय केंद्र मद्रास येथील अड्यार येथे तर भारतातील केंद्र वाराणसीला आहे. शिवाय प्रत्येक राज्यात आणि बहुतेक देशांमध्ये केंद्र आहेत.

या सोसायटीच्या श्रध्देनुसार जगाला संदेश देण्यासाठी, नैतिक शिकवण देण्यासाठी वेळोवेळी **'जगत् गुरु'** अवतार घेत असतात. गौतमबुध्द, ख्रिस्त, झरतुष्ट्र हे जगतगुरुच होते. विसाव्या शतकात असेच एक जगत्गुरु अवतार

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

घेणार आहेत, असा त्यांचा समज होता. आणि विसाव्या शतकातील जगतगुरुचा हा मान त्यांनी कृष्णमूर्ती यांना दिला आणि ते ''विसाव्या शतकातील जगत्गुरु आहेत'' असे या सोसायटीने मानले. सोसायटीचे रेव्हरंड चार्ल्स वेबस्टर लेडबीटर (1847-1934) आणि ॲनी बेझंट (1847-1933) यांनी कृष्णमूर्तींच्या सातव्या वर्षी त्यांच्यामधील गुरुपण ओळखून त्यांच्या शिक्षणाची व आध्यात्मिक प्रशिक्षणाची जबाबदारी घेतली.

प्रारंभी कृष्णमूर्तींनाही असेच वाटत होते. तथापि नंतर त्यांनी ही सोसायटी, त्यास पूरक असणारे इतर संघ व इतर परंपरा नाकारल्या. त्यांच्या मते,परंपरा सत्याकडे नेत नसते. ती उलटपक्षी माणसाला बध्द करते. त्यांचे मुख्य प्रतिपादन म्हणजे ''सत्याप्रत जाण्यासाठी कोणताही विशिष्ट रस्ता नसतो. सत्यप्राप्तीसाठी संघ, संघटना, संस्था, धर्म, धर्मसंस्था, कर्मकांड, ग्रंथ यांची गरज नसते. सत्य हा प्रत्येकाचा स्वत:चा शोध आहे,'' हे प्रतिपादन 1929 साली जाहीरपणे करून त्यांनी प्रत्येक परंपरा नाकारलीच पण स्वत:चे गुरुपदही नाकारले. थिऑसॉफी सोसायटीशी असलेले सारे संबंध तोडले. नंतर साऱ्या जगभर ते व्याख्याने देत राहिले. या अर्थाने ते आधुनिक बंडखोर तत्त्ववेत्ते होते.

कृष्णमूर्तींच्या चिंतनात 'श्रवण','पाहणे','अवधान','आकलन','जाणीव,'संस्कार,'बध्दता,'विचार,'मुक्ति', 'काल',अशा अनेक संकल्पना येतात. त्याप्रत्येकास विशिष्ट अर्थ आहे. आणि या साऱ्यांमध्ये सुसंगती आहे.

## कृष्णमूर्तींच्या विचाराचे मध्यवर्ती सूत्र

अंतिम सत्य, सद्वस्तू, ईश्वर, आत्मा, पापुण्य, स्वर्गनरक या अनुभवास न येणाऱ्या समस्यांपेक्षा थेट प्रत्यक्ष जीवनविषयक प्रश्नांवर कृष्णमूर्तींनी लक्ष केंद्रीत केले. त्यांचा मते, आपले खासगी व सार्वजनिक जीवन रूक्षपणा, विविध पातळीवरील संघर्ष व निराशा यांनी ग्रासलेले आहे. ही व्यक्तिगत नसून सामाजिक आणि तीही जागतिक समस्या आहे.तथापि त्यातून सुटून एक शांत, प्रगाढ व उदात्त जीवन जगणे शक्य आहे, असा विचार ते मांडतात.

जीवन हेच खरे सत्य आहे.जीवनाच्या पोषणाकडे, त्यातील घटकांकडे आपण दुर्लक्ष करीत राहातो, याचे भान जागे करणे आवश्यक असून तेच नैतिक कर्तव्य असते.पण आपण तेच नेमके विसरतो.तत्त्वज्ञान जीवनाकरीता असते, जीवन तत्त्वज्ञानाकरीता नसते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

### मनाची संकल्पना

जीवनाच्या समस्यांचे मूळ माणसाच्या मनाच्या रचनेत असते.या मनाचे अज्ञान हेच मूळ अज्ञान आहे. मनाची रचना, विचार पध्दती आणि कार्यपध्दती यातच मानवी समस्यांचे रहस्य दडलेले आहे. त्यांच्या मते, मनाचे काही दोष आहेत, की ज्यामुळे समस्या निर्माण होतात.

1. मनात जे काही येते, त्यास नामरूप देवून मन कृत्रिम जगाची निर्मिती करते. त्यात गुंतते, बध्द होते.
2. असे बध्द मन स्वत:ची आंतरीक शक्ति विसरून समस्यांची शृंखला निर्माण करते.
3. मनाचे बाह्य व अंर्तमन अथवा बोधात्म मन आणि अबोध मन अशी रचना असते.
4. आपले मन पूर्व संस्कारांनी बध्द झालेले असते.पण हे बध्द मन बाह्य मन नसून अंर्तमन असते.देश, धर्म आणि भाषा यासारख्या संस्कारांनी मनात संघर्ष, अभिमान भरले जातात.
5. मन निर्माण करते अशा काही समस्या:

   (a) तुलना : गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, चांगले-वाईट , इ.
   (b) महत्वाकांक्षा : भविष्य ताब्यात हिंसक भावना. वर्तमानाकडे दुर्लक्ष होवून अवास्तवावर भर.
   (c) अहंकार : अस्थिर मन सतत वासनाग्रस्तता, सत्ताकांक्षा, युध्दे,इ.
   (d) असुरक्षितता : संघर्ष, युध्दस्थितीमुळे असुक्षितता येते.

### मनाचे निरीक्षण :

अशा अनिश्चित मनाचे निरीक्षण करणे हाच त्यावर उपाय आहे. जागृत व अर्धजागृत मन कसे कार्य करते, त्याचे पीरणाम काय होतात, त्यातून मुक्ति कशी मिळू शकते, याचा विचार गरजेचा आहे.अर्धजागृत मन बध्द होते तर पूर्णजागृत मन हे मुक्त असते. पण अर्धजागृती पूर्णजागृतीला झाकोळून टाकते. तो झाकोळ दूर करणे, हीच मुक्ति असते. त्यासाठी अर्धजागृत मनाचे तटस्थ निरीक्षण करावे. पूर्णजागृत मन ते करू शकते.किंबहुना तेच त्याचे काम असते.

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



## विज्ञाननिष्ठ मन आणि धर्मशील मन

एका व्याख्यानात त्यांनी मनाच्या दुसऱ्या पैलूवर चिंतन व्यक्त केले. त्यांच्या मते, 'जगाचे प्रश्न सोडवू शकणारी दोन प्रकारची मने असतात. विज्ञाननिष्ठ मन आणि धर्मशील मन.दोन मने याचा जीवनाकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन होय.विज्ञाननिष्ठ मन तर्कशुध्द विचार करणारे, स्पष्ट, स्वतंत्र, पूर्वग्रहाशिवाय, भितीमुक्त आणि प्रयोगशील असते. असे मन नेमकेपणे विचार करते.सूक्ष्मदर्शकाखाली जणू काही प्रत्येक निरीक्षण तपासून पाहते.स्वत:ला फसू देत नाही. हे मन वस्तुस्थितीशी संबंधित असते. 'शोध'हाच त्याचा जिवितहेतू असतो, तेच त्याचे दर्शन असते.जसे आहे तसे पाहूनच ते विज्ञाननिष्ठ निष्कर्ष काढते व सिध्दांत रचते.

वैज्ञानिक भावनेचा व्यक्तिच्या परिस्थितीशी, राष्ट्रवादाशी, वंश, पूर्वग्रह इत्यादीशी कसलाही संबंध नसतो.पण वैज्ञानिक हा ही माणूस असतो. प्रयोगशाळेत नसताना वैज्ञानिक हा ही अनेक सामान्यांपैकी एक सामान्य माणूस असतो.इतरांसारखेच त्याला पूर्वग्रह, महत्वाकांक्षा, मत्सर,द्वेष असतात. तो अनेक मोहांना बळी पडू शकतो.

धर्मशील मन कसे असते? खरे धर्मशील मन कुठल्याही धर्माशी, संघटनेशी, चर्च-मंदिर-मशीद यांच्याशी निगडीत नसते. ते मुस्लिम, बौध्द, हिंदू असे काहीही नसते.कोणत्याहद विशिष्ट श्रध्दा,ठाम मते या मनात नसतात. धर्मशील मन संपूर्णपणे एकाकी (Alone),असते पण अलग पडलेले, एकटेपणा असणारे असे नसते.अशा मनाने सर्व श्रध्दा, धार्मिक मते इत्यादींमधील असत्य जाणलेले असते. ते राष्ट्रवादी नसल्याने ते अमर्याद, नवीन, तरुण व टवटवीत असते.केवळ असेच मन ज्यास ईश्वर किंवा अमेय म्हंटले जाते, त्याला स्पर्श करू शकते.त्याचा अनुभव घेवू शकते.ते गत कालाने प्रभावित नसते. भूतकालाशी जखडलेले नसते.[1]

खरे धर्मशील मन म्हणजे मनाची अशी अवस्था की जिथे पूर्ण निर्भयता असते. तिथे कशावरही श्रध्दा राखण्याची बातच नसते.या मनाचा स्थायीभाव शांतीची अवस्था असते. ती शांती विचारांमधून नव्हे तर ती सावधानतेतून उदयास येते.ती शांती म्हणजे 'ध्याता'(ध्यान, आत्मनिरीक्षक)म्हणून काहीच न उरलेली चिंतनाची खरी अवस्था.केवळ चेतना आणि कृती यांचा संगम![2]

धर्मशील मन व विज्ञाननिष्ठ मन याचा संयोग ज्यात होतो, असा 'नवा माणूस'च नव्या जगाची निर्मिती करू शकतो.आणि असा माणूस, असे मन निर्माण करणे हेच शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असते.

पण एकाचवेळी धर्मशील असणे आणि विज्ञाननिष्ठ असणे कठिण आहे.स्वत:ला जाणल्याशिवाय असे मन तयार होवू शकत नाही.संपूर्ण आत्मज्ञानाशिवाय मन धार्मिक होवूच शकत नाही.विज्ञाननिष्ठ मनाचा धर्मशील मनात अंतर्भाव असतो, पण विज्ञाननिष्ठ मनात धर्मशील मन असेलच असे नाही.कारण विज्ञाननिष्ठ मन काल, ज्ञान, यश, उपयुक्तता या संकल्पनांवर आधारित असते. जेंव्हा या मर्यादा ते ओलांडते तेंव्हाच ते धार्मिक मनाच्या आसपास जावू लागते. धर्मशील मनच सर्व कालातील सर्व प्रकारच्या आव्हांनाना तोंड देवू शकते.''[3]

## 1. सत्य - पथहीन प्रदेश.

' सत्य म्हणजे काय ? ' हा तत्वज्ञानातील एक अतिशय महत्वाचा मूलभूत प्रश्न असून त्यातून सत्ताशास्त्र किंवा सद्वस्तूमीमांसा विकसित होते.ब्रह्म, ईश्वर किंवा सद्वस्तू हीच अंतिम सत्य असून बाह्य जग हा मिथ्या किंवा भास आहे, ईश्वरभक्ति, प्रार्थना, साधूजीवन हे सत्याचे मार्ग आहेत, असेही आजवर समजले गेले. कृष्णमूर्तीसुध्दा सत्य संकल्पनेचा विचार करतात. तथापि त्यांची सत्याची व्याख्या, संकल्पना अतीत नाही, ती इहवादी म्हणावी लागेल. पारंपररिक सत्ताशास्त्र ते नाकारतात.

कृष्णमूर्तींची सत्यविषयक संकल्पना The Kingdom Of Happiness, Who brings the Truth, By what Authority Life in Freedom या व्याख्यांनांमधून व्यक्त होते. त्याचप्रमाणे 'तारका संघ' च्या विसर्जनप्रसंगी ओमान

[1]जे.कृष्णमूर्ती, भ. ग. बापट, पान 239 ते 241, चंद्रकला प्रकाशन, प्रथमावृत्ती मे 1994

[2]ज्ञातापासून मुक्ति, मेरी लेटियन्स संपादित Freedom From Known चे मराठी भाषांतर- दिवाकर घैसास,पान 129, कृष्णमूर्ती फाउंडेशन, बॉबे सेंटर , प्रथमावृत्ती ऑगस्ट 1982

[3]जे.कृष्णमूर्ती, भ. ग. बापट, पान 239 ते 241, चंद्रकला प्रकाशन, प्रथमावृत्ती मे 1994

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

(हॉलंड) येथे 03 ऑगस्ट 1929 रोजी दिलेल्या व्याख्यानामधून ती संकल्पना जास्त स्पष्ट झाली आहे. या व्याख्यानात ते म्हणतात,

"मी स्पष्टपणे सांगतो की, *सत्य हा एक रस्ता नसलेला प्रदेश आहे.* अमुक एका रस्त्याने अमुक एका धर्माद्वारे किंवा अमुक एका पंथाद्वारे तुम्हाला सत्याप्रत पोचता येणार नाही. .. .. .. सत्य हे अमर्याद, असंस्कारबद्धता असल्याने आणि कुठल्याही मार्गाने प्राप्त करुन घेता येणार नसल्याने त्याला संघटित स्वरुप येत नाही. लोकांना एका विशिष्ट मार्गाने नेण्यासाठी किंवा त्यांना जबरदस्तीने त्यात ओढण्यासाठी एखादी संघटनाही स्थापन करु नये. हे जर तुम्हाला समजत असेल तर एखादया श्रद्धेभोवती संघटना उभी करणे कसे अशक्य आहे, हे तुम्हांला दिसून येईल. श्रद्धा ही केवळ व्यक्तिगत बाब आहे. आणि तिला संघटित स्वरुप देता येणे शक्य नाही... .. तुम्ही जर तसे केले तर ती श्रद्धा मृत होते, स्फटिकासारखी कठीण रुप धारण करते. इतरांवर लादण्यासाठी तिचा एखादा संप्रदाय, एखादा पंथ किंवा एखादा धर्म बनून जातो.

जगभर सगळीकडे प्रत्येकजण हेच करण्याच्या प्रयत्नात असतो. जे दुबळे आहेत, जे क्षणिक असमाधानी झालेले आहेत त्यांच्यासाठी सत्याचा संकोच करुन त्याचे खेळणे बनविले जाते.सत्याचे अवतरण करता येत नाही. उलट व्यक्तीनेच त्याच्याप्रत जाण्यासाठी आरोहणाचा प्रयत्न केला पाहिजे. तुम्ही पर्वतशिखर पर्वताच्या पायथ्याशी आणू शकत नाही. तुम्हाला गिरीशिखर गाठायचे असेल तर दरीतून जायला हवे, धोक्याच्या कड्यांना न भिता चढणीच्या जागा पार करायला हव्यात. [सत्याप्रत तुम्ही आरोहण करायला पाहिजे.ते खाली आणता येणार नाही.] तत्वप्रणांली किंवा कल्पनांबददलची आवड संघटनाप्रमाणे कायम राखली जाते पण या संघटना केवळ बाहेरुनच आवड निर्माण करु शकतात. निखल सत्यावरील प्रीतीमधून जी आवड उपजलेली नसते, पण ती संघटनेद्वारे निर्माण केली जाते, तिला मुळीच महत्व नसते. संघटना म्हणजे ज्यात तिचे सभासद सोयिस्करपणे बसू शकतात अशी चौकट बनते. तिचे सभासद मग सत्याप्रत जाण्याचा किंवा गिरिशिखर गाठण्याचा प्रयत्न करत नाहीत, तर उलट स्वत:साठी एक सोयिस्कर जागा तयार करुन तिथे आश्रय घेतात किंवा संघटनेकडून त्या ठिकाणी स्वत:ला ठेवून घेतात आणि असे गृहीत धरुन चालतात की त्यामुळे संघटना त्यांना सत्याप्रत घेऊन जाईल."

सत्य म्हणजे काय ? या प्रश्नाच्या उत्तरादाखल एकदा ते म्हणतात, " ईश्वर, मुक्ति अथवा सत्य असे जे काही नाव दिले जाते ते एकच आहे. मनाची स्मृतींच्या ओझ्यापासून मुक्ति म्हणजे सत्य. सत्य म्हणजे तुमच्या आतील आणि बाहेरच्या जीवनाचे सतत अवधान."[4] येथे कृष्णमूर्तींना अवधान याचा अर्थ आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण आपण संपूर्णपणे जगणे, असा अर्थ अपेक्षित आहे.अवधानपूर्ण जगणे ही मुक्ति. सत्य म्हणजे अमूर्त गोष्ट नाही. तसेच तत्त्वज्ञान किंवा गूढज्ञान नाही.सत्य म्हणजे रोजचे जीवन,असे ते म्हणतात.ते अनुभवणे म्हणजे जीवनातील शहाणपणा आणि अर्थ प्रत्यक्ष पाहणे होय.[5]

"आपल्याला आपल्या रोजच्या जीवनात सत्याची प्रचीती कशी येऊ शकेल?" या प्रश्नावर **कृष्णमूर्ती** उत्तर देतात, "तुम्हांला असे वाटते की,सत्य ही एक वेगळी गोष्ट आहे आणि तुमचे रोजचे जीवन ही दुसरीच काही तरी गोष्ट आहे ! आणि तुम्ही ज्याला सत्य म्हणता, त्याची तुम्हांला रोजच्या जीवनात प्रचीती यायला हवी आहे. पण सत्य हे रोजच्या जीवनापेक्षा आणखी वेगळे आहे का ?

तुम्ही मोठे व्हाल तेव्हा तुम्हांला आपला चरितार्थ चालवावा लागेल. तुम्ही परिक्षा पास होता त्याचा हेतू चरितार्थ हाच आहे. चरितार्थ चालविण्यासाठी कसेही करुन नोकरी मिळविता. सैनिक,पोलिस,वकील किंवा एखादा कपटी व्यापारी व्हायलासुध्दा लोक तयार असतात.

आता, उपजिविकेचा योग्य व्यवसाय कोणता, हे खरोखर शोधून काढणे महत्वाचे आहे. कारण सत्य हे तुमच्या जीवनातच आहे. त्यापासून ते कुठे तरी दूर नाही. तुम्ही कसे बोलता, तुम्ही काय म्हणता, तुम्ही कसे हसता, तुम्ही फसवणूक करणारे आहात काय, तुम्ही लोकांना बनविता का, हेच सारे तुमच्या जीवनातले सत्य आहे. तेव्हा तुम्ही

---

[4] जे.कृष्णमूर्ती, भ. ग. बापट, पान 135,चंद्रकला प्रकाशन, प्रथमावृत्ती मे 1994

[5] जे.कृष्णमूर्ती, भ. ग. बापट, पान 135,चंद्रकला प्रकाशन, प्रथमावृत्ती मे 1994



Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

सैनिक, पोलिस, वकिल किंवा चलाख लबाड व्यापारी होण्यापूर्वी त्या व्यवसायातील सत्यता तुम्ही पाहायला नको का? खरोखर तुम्ही काय करता त्याचे सत्य स्वरुप तुम्ही पाहायला नको का ? खरोखर तुम्ही काय करता त्याचे सत्य स्वरुप तुम्ही पाहिले नाही, आणि जर त्या सत्याच्या मार्गाने गेला नाही तर तुमचे जीवन हिडीस होते.''

कृष्णमूर्ती सैनिकाचे उदाहरण घेतात. एखाद्याने सैनिक व्हावे की नाही, या प्रश्नाचे ते विश्लेषण देतात. कारण इतर व्यवसाय थोडे जास्त गुंतागुंतीचे आहेत. आता, त्यांच्या मते, सैनिकाच्या व्यवसायातले सत्य काय आहे? एखादा मनुष्य सैनिक झाला तर त्याने देशाच्या रक्षणासाठी लढणे आवश्यक असते. विचार न करता मुकाट्याने आज्ञा पाळण्याची शिस्त त्याने स्वत:च्या मनाला लावून घ्यावी लागते. त्याने मारायला किंवा मरायला सज्ज असावे लागते. कशासाठी? केवळ कुणी तरी थोर किंवा क्षुद्र माणसे, ''एखादी कल्पना किंवा एखादा सिध्दांत खरा आहे'' असे म्हणाली म्हणून !

5

कृष्णमूर्ती म्हणतात, ''तुम्ही आत्मबलिदान करण्यासाठी किंवा दुस-यांना मारण्यासाठी सैनिक बनता. हा पेशा योग्य आहे का? दुस-या कोणाला विचारु नका. तुम्ही स्वत:च या विषयातील सत्य ओळखून काढा. भविष्य काळातील एखादया आश्चर्यकारक कल्पनारम्य गोष्टीसाठी तुम्हांला दुस-याला मारायला सांगितले जाते. जणू काही तुम्हांला सांगणा-या त्या माणसाला सारे भविष्य कळतेच आहे. तुमच्या देशासाठी असो, किंवा एखादया संघटित धर्मासाठी असो, हत्या करणे हा धंदा योग्य आहे असे तुम्हांला वाटते का? हत्या ही मुळात कधी तरी योग्य असते का?''

''तेव्हा, तुम्हांला जर तुमचे जीवन ही जी अंत्यत महत्वाची प्रक्रिया आहे. तिचे सत्य ओळखून काढायचे असेल तर तुम्हांला या सा-या गोष्टींत अत्यंत खोल शोध घ्यावा लागेल. त्यात तुम्हांला तुमचे अंतकर:ण, तुमचे हदय,ओतावे लागेल. तुम्हांला स्वतंत्रपणे, स्पष्टपणे, पूर्वग्रह न धरता विचार करावा लागेल. कारण सत्य हे जीवनाहून वेगळे नसते. ते तुमच्या रोजच्या व्यवहारात असते.''

## 2. ज्ञातापासून मुक्ति

ज्ञान म्हणजे काय ? याचा विचार करताना कृष्णमूर्तींना विज्ञान व तंत्रज्ञान जे ज्ञान देते ते नाकारावयाचे नाही. ते रोजच्या जगण्यासाठी आवश्यक आहे, याचा ते आग्रहही धरतात. पण मानसशास्त्रीय व ज्ञानशास्त्रीय ज्ञान म्हणजे ज्ञान नव्हे, असे ते म्हणतात. स्मतीत साठवले जाते ते सारे ज्ञान याचप्रकारचे असते. असे ज्ञान म्हणजे संचितस्मृती आणि विचार म्हणजे या स्मृतीचा प्रतिसाद असते.

दैनंदिन जीवनात विचारांचे, विचार प्रक्रियेचे नेमके स्थान काय असते ? यावर त्यांनी भर दिला.पण विचारांचे जेंव्हा ज्ञानात रूपांतर होते आणि गतकालीन घटनांचे ते ओझे बनते, तेंव्हा ते धोकादायक बनते, असा इशारा ते देतात. त्यांच्या मते ,''ज्या जगात आपण जगतो, त्याचे आकलन करण्यात आणि ते जाणण्यात हाच सर्वात मोठा अडथळा ठरतो. विशेषत: जे नातेसंबंध हे ज्ञान प्रस्थापित करते, तो तर कमालीचा अडसर बनतो. ज्ञान अनिवार्य खरे, पण ते मेंदूचे केवळ तांत्रिक कार्य आहे.नोंद करून ठेवण्याची मनाची क्षमताच अडसर निर्माण करते. उदाहरणार्थ दुखावणारे शब्द स्मृति बनून नातेसंबंधास इजा करीत राहतात.अशा रितीने ज्ञान हा मुक्तीचा मार्ग न होता, नातेसंबंधांतीत दरी निर्माण करणारे आणि विध्वंस करणारे अस्त्र बनते.''

कृष्णमूर्ती एक मूलभूत प्रश्न उपस्थित करतात,

''मेंदू - त्याच्या सर्व प्रतिक्रियांसह आणि त्याच्या सर्व आव्हानांना आणि मागण्यांना तातडीने प्रतिसाद देण्याच्या समतांसह-स्तब्ध राहू शकतो का ? ''

आणि उत्तर देतात,

'' विचारांचा अंत करणे, हा प्रश्न नाही. पण मेंदू स्तब्ध राहू शकतो का? ही स्तब्धता म्हणजे शारिरीक मृत्यू नव्हे. मेंदू स्तब्ध होतो, तेंव्हा काय घडते, ते जरा पाहा.''

कृष्णमूर्ती पुढे म्हणतात, ''संस्कारबध्द होण्यात, विविध नोंदी करून ठेवण्यात तरबेज झालेला मेंदू सुरक्षितता आणि स्थैर्य देतो आणि जणू काही 'अमृतत्वाची जाण' देववितो. मेंदूच्या नोंदी मग एखाद्याची प्रतिम निर्माण करतात, प्रेमळ माणसाची, राजकारण्याची, धर्मोपदेशकांची, पुजाऱ्यांची आणि एक आदर्शाची देखील. या प्रतिमा कायमच्या

झाल्या की असा माणूस मग नेहमीच दु:खग्रस्त बनतो, ज्यात स्वातंत्र्य नाही, अशा धोपटमार्गात अडकून पडतो. पण जर एखाद्याने कुठल्याही प्रतिसादांशिवाय जगण्याचा ध्वनी ऐकला की नोंदी करणारे केंद्रच उरत नाही. तो मुक्तिचा मार्ग बनतो.''

केवळ शांत मनातच महान गोष्टींचा जन्म होत असतो आणि शांत मन अथक प्रयत्नांमधून, नियंत्रणातून, शिस्तीतून अस्तित्वात येत असते.

सतत अवधान बाळगणे म्हणजे स्थळ-काळाच्या मर्यादाच राहणार नाहीत, असे होईल का ? यावर कृष्णमूर्तींचे उत्तर असे की या मर्यादा उरणारच नाहीत.भूतकाळ म्हणजे स्मृतींची साठवण. अशी साठवण ही मृत गोष्ट असते.स्मृतीचा भार थांबला की मर्यादा थांबते. भविष्यकाळाबद्दलही नेमके हेच घडते. भविष्याची आसक्ति साठवण बनते. म्हणून मुक्ति ज्ञातापासून असते तशी अज्ञातापासूनही असली पाहिजे.[6]

ज्ञान हे ओझेच असते.हे ओझे माणसातील सर्जनशीलता नष्ट करते.सर्जनशील असणे म्हणजे प्रत्येकक्षणी भूतकालापासून स्वतंत्र असणे.ही स्थिती माणसाला मुक्ततेकडे नेते.ओझे असणारे ज्ञान मिथ्या, असत्य असते.हे असत्य ओळखणे व ते नाकारणे ही प्रज्ञा होय. प्रज्ञेमार्फतच सत्याचे थेट दर्शन होते.

''प्रज्ञा म्हणजे काय?'' या प्रश्नावर कृष्णमूर्ती म्हणतात की या प्रश्नाचे उत्तर सावकाश शोधून काढावे लागेल. पण शोधून काढणे म्हणजे एखादा अंतिम निष्कर्ष काढणे नव्हे, कारण शोधणे व निष्कर्ष काढणे या दोहोंत फरक आहे.

ते म्हणतात, ''प्रज्ञा म्हणजे काय हे ज्या क्षणी तुम्ही निश्चित ठरवून टाकता, त्या क्षणी तुम्ही प्रज्ञावंत राहत नाही! पुष्कळशा जुन्या लोकांनी हेच केले आहे. ते प्रत्येक गोष्टीचे निष्कर्ष काढून बसले आहेत, त्यामुळे ते प्रज्ञावंत राहिलेलेच नाहीत. म्हणून तुम्ही एक गोष्ट तर पहिल्या झटक्यात शोधून काढली आहे. ती अशी की जे मन सतत शिकत असते आणि कधीही निर्णय करीत नाही तेच मन प्रज्ञावंत असते.

''प्रज्ञा म्हणजे काय ?'' प्रज्ञेच्या व्याख्येनेच पुष्कळशा लोकांचे समाधान होते. 'हे फार चांगले स्पष्टीकरण आहे'. असे तरी ते मानतात. किंवा ते स्वत:चेच स्पष्टीकरण मान्य करतात. आणि जे मन स्पष्टीकरणाने समाधान पावते ते फार उथळ असते. आणि म्हणूनच ते प्रज्ञावंत नसते.

खरे प्रज्ञावंत मन हे स्पष्टीकरणे व निष्कर्ष यांनी समाधान पावणारे मन नसते, ते मन श्रद्धाळूही नसते. कारण श्रद्धा म्हणजे एक प्रकारचा निष्कर्षच असतो. प्रज्ञावंत, सुज्ञ, शहाणे मन हे चौकस मन असते. ते निरीक्षण करणारे, शिकणारे, अभ्यास करणारे मन असते. याचा अर्थ काय? म्हणजे असे की तुम्ही जेव्हा निर्भय असता आणि ईश्वर म्हणजे काय हे शोधण्यासाठी किंवा कोणत्याही गोष्टीमधील सत्य हुडकून काढण्यासाठी तुम्ही बंड करुन संपूर्ण समाजाच्या पठडीविरुद्ध उभे राहण्यास तयार होता, तेव्हाच प्रज्ञेचे अस्तित्व असते.

अर्थातच ज्ञान म्हणजे प्रज्ञा नव्हे. तुम्ही जगातील सारी पुस्तके वाचू शकलात तरी त्यामुळे तुम्हांला प्रज्ञा मिळणार नाही.प्रज्ञा ही एक सूक्ष्म, तरल गोष्ट असते. ती कशाशीही जखडलेली नसते. तुम्ही जेव्हा तुमच्या मनाची संपूर्ण प्रक्रिया समजून घेता, एखादा तत्वज्ञ किंवा शिक्षक मनाबददल काय म्हणतो ते प्रमाण मानून नव्हे, तर तुमच्या स्वत:च्या मनाची प्रक्रिया समजून घेता तेव्हा प्रज्ञा उदयास येते. तुमचे मन हा संपूर्ण मानवजातीचा परिपाक आहे. आणि जेव्हा तुम्हांला तुमच्या मनाचा बोध होतो तेव्हा तुम्हांला एकही पुस्तक वाचावे लागत नाही. कारण भूतकाळातील सर्व ज्ञान ह्या मनात असते. स्वत:ला समजून घेत असतांना प्रज्ञा अस्तित्वात येते आणि जगातील लोकांशी, वस्तूंशी व कल्पनांशी तुमचा जो संबंध आहे त्यातूनच तुम्ही स्वत:ला समजून घेऊ शकता. एखादी विद्या अवगत करावी त्याप्रमाणे प्रज्ञा ही प्राप्त करावयाची वस्तूच नव्हे. जेव्हा अंतरंगात प्रचंड क्रांती होते, जेव्हा भीती अजिबात नसते, तेव्हाच ती प्रज्ञा उदयास येते. याचाच अर्थ, जेव्हा प्रेमभावना असते तेव्हा प्रज्ञा असते. कारण प्रीती ही निर्भय असते.

''प्रज्ञा म्हणजे काय'' हे विचारणे हे ''जीवन म्हणजे काय'' असे विचारण्यासारखे आहे. जीवन म्हणजे अभ्यास, क्रीडा, विषयोपभोग, काम, भांडणे, हेवा, महत्वाकांक्षा,प्रेम, सौंदर्य, सत्यजीवन म्हणजे सर्व काही असते.''

---

[6] जे.कृष्णमूर्ती, भ. ग. बापट, पान 135,चंद्रकला प्रकाशन, प्रथमावृत्ती मे 1994

मग खरे ज्ञान कोणते ? तर कृष्णमूर्तींच्या मते,अज्ञानाचा अभाव नाहीसा करणे. तो नाहीसा होतो, जेंव्हा माणसाला आत्मज्ञान होते तेंव्हा. अज्ञान म्हणजे स्वज्ञानाचा अभाव. आपल्या स्वत:संबंधीच्या कृती, भावना, विचार यांचे निरीक्षण, अवलोकन म्हणजे खरे ज्ञान. स्वत:संबंधीचे संपूर्ण प्रक्रियेचे प्रत्येक क्षणाचे अवधान हेच सत्य ज्ञान. स्वत:संबंधीच्या ज्ञानात मन, मनाच्या क्षमता, कार्य, समस्या आणि त्यावरील तटस्थ निरीक्षणासारखे उपाय यांचा अंर्तभाव होतो. असे स्वज्ञान हाच आपल्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन असतो.तो बाळगणे म्हणजे सत्याचे आकलन!

**स्वातंत्र्य**

'*संस्कृतीचा प्रश्न*' या ग्रंथात कृष्णमूर्ती म्हणतात, "स्वातंत्र असणे, मुक्त असणे, म्हणजे काय ? तुम्हांला सोयीचे वाटेल तेच करणे, तुम्हांला जावेसे वाटेल तिकडेच जाणे, मन मानेल तसा विचार करणे या गोष्टी म्हणजे स्वातंत्र्य असते का? या गोष्टी तर तुम्ही करीत असता. केवळ स्वावलंबी असणे म्हणजे स्वातंत्र्य असते का? जगात पुष्कळ लोक स्वावलंबी आहेत, होय की नाही ? स्वतंत्र असणे म्हणजे प्रज्ञावंत असणे. पण प्रज्ञा काही नुसती स्वातंत्र्याची इच्छा मनात धरुन अस्तित्वात येत नसते.

तुम्ही जेव्हा तुमच्या भोवतालची सर्व परिस्थिती, तुमच्या वर सतत दडपण आणणारे सामाजिक, धार्मिक, आईवडीलांचे आणि रुढींचे प्रभाव समजून घेण्यास सुरुवात करता तेव्हाच प्रज्ञा अस्तित्वात येते. पण हे सर्व प्रभाव समजून घेण्यासाठी तुमच्या आई-वडीलांचा प्रभाव, तुमच्या सरकारचा, समाजाचा, तुम्ही ज्या संस्कृतीत वाढलात त्या संस्कृतीचा, तुमच्या श्रध्दांचा,तुमच्या देव-देवतांचा आणि भोळया समजुतींचा, तसेच जरासुध्दा विचार न करता ज्या रुढी तुम्ही पाळता त्यांचा हे सर्व प्रभाव समजून घेण्यासाठी आणि त्यातून मुक्त होण्यासाठी सखोल अंतमुर्ख दृष्टी असावी लागते.

पण तुम्ही नेहमी मनातून घाबरलेले असता, म्हणून सामान्यपणे या प्रभावांच्या जोखंडाखाली मान देता. आपल्याला जीवनात प्रतिष्ठित पद मिळणार नाही याची तुम्हांला भीती वाटते. तुमचे पुरोहित काय म्हणतील याची तुम्हांला भीती वाटते. पण मुक्ती, स्वतंत्रता ही मनाची अशी अवस्था असते. की तेथे भय नसते, सक्ती नसते आणि सुरक्षित राहण्याची धडपडही नसते."

**चिंतन आणि सत्य यातील फरक**

"चिंतनाच्या वेळीही सत्य काय आहे त्याचे आकलन करणे आम्हांला शक्य होत नाही. तेव्हा सत्य काय आहे ते आपण आम्हांला सांगाल काय ?" या प्रश्नावर कृष्णमूर्ती म्हणतात, "सत्य काय आहे? हा प्रश्न आपण क्षणभर बाजूस ठेवू.'चिंतन म्हणजे काय?' याचा विचार प्रथम करु या. माझ्या दृष्टीने चिंतन हे तुम्हांला तुमच्या ग्रंथांनी व गुंरुनी जे काही शिकविले आहे त्यापेक्षा अगदी निराळे असे काही तरी आहे.

चिंतन ही तुमचे स्वत:चे मन समजून घेण्याची प्रक्रिया आहे. तुम्हांला जर आपल्या विचारप्रक्रियेचा बोध झाला नसेल. म्हणजेच स्वत:चा बोध झाला नसेल तर तुम्ही जो काही विचार करता त्याला अगदी थोडा अर्थ आहे. निजबोधाचा पाया नसेल तर विचार करणे उपद्रवकारक होते. प्रत्येक विचाराला महत्व असते आणि मनाला जर केवळ एक किंवा दोन विचारांचेच महत्व नव्हे, तर प्रत्येक विचार जसजसा उदयास येतो तसतसे त्याचेही महत्व आकलन करण्याची पात्रता नसेल, तर एखादी कल्पना, एखादी प्रतिमा किंवा मंत्रजप यावर मन केंद्रित करणे म्हणजे स्वत:वर मोहिनी घालण्याचाच एक प्रकार असतो. आणि यालाच लोक सामान्यत: चिंतन म्हणतात."

पण कृष्णमूर्तींच्या मते हे खरे चिंतन नाही. खरे चिंतन आत्मज्ञानातूनच व्यक्त होते. ते म्हणतात की तुम्ही स्वस्थ बसलेले असा, बोलत असा किंवा चालत असा, तुम्हांला तुमच्या प्रत्येक विचारांचे, तुमच्या ठायी असलेल्या प्रत्येक प्रतिक्रियेचे भान असते का हे करुन पाहा, म्हणजे, तुमच्या स्वत:च्या विचारांची प्रत्येक हालचाल ध्यानी येणे किती अवघड आहे हे तुम्हांला कळेल. कारण विचारांची एकावर एक अत्यंत वेगाने रास होत असते. पुढे चढत असतात. पण तुम्हांला जर प्रत्येक विचार तपासायचा असेल, त्याचा आशय खरोखरच जर पाहायचा असेल तर तुम्हांला असे आढळून येईल की, त्यामुळेच तुमच्या विचारांची गती कमी होत आहे. आणि तुम्ही त्यांचे निरीक्षण करु शकता. विचार करण्याची गती कमी होणे व प्रत्येक विचारांची तपासणी करणे हीच चिंतनाची प्रक्रिया असते. आणि तुम्ही जर त्यात शिरलात तर तुम्हांला असे दिसून येईल की प्रत्येक विचारांचे भान ठेविल्यामुळे तुमचे मन अतिशय शांत होते. पूर्णपणे स्तब्ध होते.

मग त्यात उत्कंठा नसते, सक्ती नसते, कोणत्याही स्वरुपाची भीती नसते. आणि त्या स्तब्धतेत जे सत्य असते ते प्रकट होते. सत्याचा अनुभव घेणारे तुम्ही अस्तित्वात नसता, तर मन स्तब्ध असते. त्यामुळे सत्य त्यात प्रवेश करते, ज्या क्षणी त्यात ''तुम्ही'' येता त्या क्षणी अनुभव घेणारा घटक येतो, आणि आनुभव घेणारा तर केवळ विचारांचा एक परिणाम असतो. विचार करणेच नसले तर त्याला काही आधारच नाही.''

## 3. शिक्षणविषयक दृष्टिकोन

शिक्षण हा विषय कृष्णमूर्तींच्या अत्यंत कळकळीचा आणि आस्थेचा आहे. त्यांनी सातत्याने याच एका विषयावर लिहीले आहे. त्यांची बारा पुस्तके तर केवळ शिक्षण या विषयावर आहेत. त्यात त्यांनी सध्याची शिक्षणपद्वती व त्यातील दोष, शिक्षकांचा धर्म, शिक्षणसंस्था कशी असावी इत्यादी पैलूंवर विस्ताराने लिहीले आहे. काही पुस्तकांत विद्यार्थी आणि शिक्षकांशी त्यांच्या ज्या चर्चा झाल्या त्यांचे शब्दश: अहवाल आलेले आहेत.

स्वत: कृष्णमूर्तींच्या प्रेरणेने वा पुढाकाराने इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, भारत या देशांत नव्या धर्तीच्या शाळा स्थापन करण्यात आल्या. त्यांना *'कृष्णमूर्ती शाळा'* असे संबोधले जाते. ब्रॉकवुड पार्क [इंग्लंड], ओहाओ [कॅलिफोनिया], राजघाट आणि ऋषिव्हॅली [भारत] या ठिकाणच्या शाळांत प्रत्येक वर्षी कृष्णजी काही दिवस घालवीत असत. तेथे त्यांच्या विद्यार्थी व शिक्षकांशी चर्चा - सभा होत. त्यावरुन कृष्णमूर्तींची शिक्षणविषयक अशी एक स्वतंत्र, नवीन, क्रांतीकारी दृष्टी स्पष्ट होते. कृष्णमूर्तींच्या संपूर्ण जीवनसृष्टीचे प्रतिबिंब त्यात पडलेले आहे.

कृष्णजीची समग्र, क्रांतीकारक जीवनसृष्टी 1929 नंतर त्यांनी सविस्तरपणे मांडलेली आहे. 1925 ते 1929 या कालत त्यांची जीवनसृष्टी सर्वागांने विकसित होत होती. पण अगदी प्रांरभीच्या काळात म्हणजे 1912 साली कृष्णजीनी *''एज्युकेशन ॲज सर्व्हिस''* हे एक छोटेखानी पुस्तक लिहीले आहे.

बनारस येथील सेन्ट्रल हिंदू कॉलेजमधील शैक्षणिक वातावरणाने ते प्रभावित झाले होते. त्या काळातील हे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. त्या पुस्तकात ते म्हणतात, *''या पुस्तिकेत मी केलेल्या ब-याच सूचना माझ्या बालपणातील शाळेच्या आठवणीवरुन सूचलेल्या आहेत. मी स्वत: शिक्षणाच्या योग्य व अयोग्य अशा दोन्ही पदधीचा अनुभव घेतलेला आहे...मी केलेल्या सूचना सर्व देश, धर्म, यांना लागू पडणा-या आहेत. मानवामानवांमधील बंधुभाव वाढीला लागावा असे शिक्षण हवे. निरनिराळ्या जाती, धर्म, वंश इत्यादीत परस्पर गैरसमज पसरु नये, वितुष्ट येऊ नये आणि आपल्याच परंपरा श्रेष्ठ असे कुणीही म्हणू नये. संकुचित देशप्रेम इतर देशांबददल द्वेष निर्माण करतो. स्वदेशाबददलचे प्रेम आणि जगातील इतर देशांबददल, एकूणच मानवजातीवरील प्रेम यांत विसंवाद, विरोध असल्याचे कारणच नाही.''*

### शिक्षणविषयक लेखन

'द पर्पझ ऑफ एज्युकेशन'(1930),'एज्युकेशन ॲन्ड सिग्निफिकन्स ऑफ लाइफ'(1953), 'ऑन लर्गींग'(1958),'लाइफ अहेड'(1975),'यू आर द वर्ल्ड'(1972),'धिस मॅटर ऑफ कल्चर'(1964),'कृष्णमूर्ती ऑन एज्युकेशन'(1974),'बिगिनिंग्ज ऑफ लर्निंग'(1975),'लेटर्स टु द स्कूल्स भाग-1'(1981),'लेटर्स टु द स्कूल्स भाग-2'(1985),'टॉक्स टु अमेरिकन स्टुडन्टस्'(1970),'थिंग्ज ऑफ द माइंड : डायलॉग्ज विथ जे. कृष्णमूर्ती' (1988).

### शिक्षणविषयक दोन दृष्टिकोन

कृष्णमूर्तींच्या मते शिक्षण दोन प्रकारचे आहे. एक शाळा-महाविद्यालयांमध्ये दिले जाणारे रुढीबध्द, शासनमान्य व समाजमान्य शिक्षण आणि दुसरे जीवन शिक्षण. जीवनाची शाळा व्यक्तिला खरे शिक्षण देते.मुक्त शिक्षण खऱ्या अर्थाने जीवन जगतानाच मिळते. जीवनाचे शिक्षण तेच सत्याचे, प्रज्ञेचे शिक्षण असते.त्यांची आदर्श शिक्षण व्यवस्था जीवनशिक्षणाविषयीची आहे. ते गृहीत धरूनच त्यांनी 'कृष्णमूर्ती स्कूल्स' सुरु केल्या.

पारंपरिक रुढीबध्द शिक्षणाने समाजाचे खूप मोठे दोष निर्माण केले आहेत.या साचेबंदपणामुळेच जगात हिंसा, भ्रष्टाचार,राजकीय व सांस्कृतिक अराजक माजले असून शिक्षकांना सुध्दा या व्यवस्थेने झापडबंद केले आहे. ते ही

केवळ घाण्याच्या बैलाप्रमाणे काम करीत राहतात आणि खऱ्या शिक्षकाचे व्यक्तिमन व समाजमन घडविण्याचे काम विसरून जातात, हा कृष्णूर्तीचा मुख्य आक्षेप आहे.

**पारंपरिक शिक्षणव्यवस्थेवरील कृष्णमूर्तींचे आक्षेप**

आजच्या शिक्षणपद्धतीवर, शिक्षणव्यवस्थेवर कृष्णमूर्तींचे अनेक आक्षेप आहेत, ते म्हणतात, ''शिक्षण व्यवस्थेच्या या प्रचंड यंत्रातून ठरीव साच्याची माणसे बाहेर पडतात. सुरक्षिततेच्या हव्यासाने हे सारे लोक पछाडलेले असतात. लौकिक प्रतिष्ठा मिळवणे हेच त्यांचे ध्येय बनलेले असते.परंपरेने चालत आलेल्या या साचेबंद शिक्षणपद्धतीमुळे स्वतंत्र बुद्धीने विचार करण्याची शक्ती खुरटुन जाते.एखादे विशिष्ट यंत्र हस्तगत करुन घेणे एवढाच अर्थ शिक्षणाला उरला आहे. व्यक्तीची प्रज्ञा जागृत करण्याऐवजी तिला एखादया विचाराच्या चौकटीची गुलामगिरी पत्करायलाच आजचे शिक्षण शिकवीत आहे. त्यामुळे आपल्या व्यक्तीमत्वाचे साकल्यात्मक असे दर्शन घेणे अशक्यच होऊन बसले आहे.

आज परिक्षा आणि पदव्यांच्या फूटपट्यांनी आपण माणसाची बुध्दिमत्ता मापू पाहतो. अशा खोट्या कसोट्या स्वीकारल्याने आत्मवंचना करणारी धूर्त, हिकमती मनेच आपण पैदा करतो. जीवनाला भिडून जीवनाचा अर्थ जाणण्याची कुवत म्हणूनच आपल्या ठिकाणी राहिलेली नाही.

तांत्रिक कौशल्यातून जीवनसाक्षात्कार घडू शकत नाही. तांत्रिक कौशल्यावरच भर दिल्यामुळे आजचे शिक्षण विफल झाले आहे. एकांगीपणातच विनाशाचे बीज आहे. कोणत्याही विषयातील तज्ज्ञाला त्याच्या एकांगीपणामुळे समग्रजीवनाचा साक्षात्कार होत नाही... तांत्रिक प्रगतीमुळे एका विशिष्ट क्षेत्रातल्या काही समस्या सुटतील हे खरे : परंतु त्यामुळे जीवनाचा साकल्यात्मक अर्थ थोडाच कळणार तांत्रिक प्रगतीमुळे मनातील संघर्ष आणि दु:खे कशी नष्ट होतील हा जीवनसाक्षात्कार न घडल्यामुळेच सारी भौतिक प्रगती ही मानवी संहाराचे साधन होऊन बसली आहे. आज अणुस्फोट करु शकणा-या माणसाच्या हदयात प्रेम नसल्यामुळे तो दैत्य बनला आहे. आपापल्या कुवतीप्रमाणे आपण आपली कार्यक्षेत्रे निवडतो. परंतु हे कार्यक्षेत्र मनातील गोंधळ आणि संघर्ष नष्ट करु शकत नाही.

माहितीचा संचय आणि शक्तीचा विकास म्हणजेच शिक्षण या आपल्या चुकीच्या समजुतीमुळेच जीवनाचे समग्र असे दर्शन आपल्याला कधीही घडत नाही.

स्वभावाप्रमाणे आणि आवडीनिवडीप्रमाणे वर्गवारी करुन मुलांचे गट पाडणारी शिक्षणपद्धती विषमता आणि भेद यावरच भर देते. त्यामुळे व्यक्तीचे मन सुसंवादी होत नाही. आणि समाजात भेद निर्माण होतात. अशा त-हेच्या शिक्षणातून काही विशिष्ट क्षेत्रांतील कर्तबगारी असलेली माणसे निर्माण होतील. परंतु सर्जनशीलतेचा अभाव त्यांच्या जीवनात राहीलच.

सरकारांना माणसे नकोत, कुशल तंत्रज्ञ हवेत. कारण ख-या अर्थाने जो माणूस आहे त्याचा धोका संघटित धर्म आणि सरकारांना सतत वाटत असतो. यामुळेच या दोन संस्था आपल्या हातात शिक्षणाची सूत्रे राहवीत म्हणून धडपडत असतात.

लौकिक अर्थाने यशस्वी झालेल्या बहुतेक शाळा ख-या शिक्षणाच्या नावाने शून्यच असतात. शेकडो मुलांनी गजबजून गेलेल्या, आणि बाह्य दृष्टीने भरभराटलेल्या या शाळा कारकून, व्यापारी, दलाल, उद्योगपती, हुकूमशहा इत्यादी उथळ प्रवृत्तीची माणसेच निर्माण करणार. या माणसांनी आपापल्या धंद्यातील तांत्रिक कौशल्य हस्तगत केलेले असेल पण त्याचा काय उपयोग? जिच्या व्यक्तीत्वात सुसंवाद निर्माण झाला आहे अशीच व्यक्ती जगाची आशा आहे. अशा व्यक्ती गर्दी जमवून साचेबंद शिक्षणाची खैरात जिथे केली जाते अशा शाळांतून निर्माण होऊ शकत नाहीत.

आज दुर्देवाने कुठलीही गोष्ट प्रचंड प्रमाणावर करण्याचा आपल्याला हव्यास जडला आहे.शाळांसाठी ज्यात जास्तीत जास्त मुले मावू शकतील अशा इमारती हव्या असतात त्याचे कारण हेच, प्रचंड प्रमाणावर या गर्दीला शिक्षण देण्याच्या नादात ख-या अर्थाने ज्याला शिक्षण म्हणता येईल ते दिलेच जात नाही याचे भानही आपल्याला नसते.

आज शिक्षणाचा कसा उपयोग केला जात आहे हे आपण पाहतच आहोत. सर्व जगभर मग तो रशिया, चीन, अमेरिका, युरोप किंवा भारतात असो माणसांना त्यांनी अनुसरावे म्हणून समाज आणि संस्कृतीत त्यांनी चपखवल बसावे, सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराच्या प्रवाहात त्यांनी मिसळून जावे, हजारो वर्ष वाहत असलेल्या प्रवाहात

त्यांना ओढून घेण्यासाठी शिक्षण दिले जात आहे. त्याला शिक्षण म्हणता येईल का? की शिक्षण म्हणजे काही अगदी वेगळीच गोष्ट आहे?त्या अफाट प्रवाहात मानवी मन ओढले जाऊन नष्ट होणार नाही असे शिक्षणातून घडू शकेल का?

**शिक्षकाचे स्थान**

कृष्णमूर्तींची शिक्षणदृष्टीत शिक्षकाचे स्थान फार वरचे आहे. स्वत: संस्कारबद्वतेपासून मुक्त होऊन आपल्या विद्यार्थ्यांना संस्कारबद्वतेपासून मुक्त करणारा शिक्षक आमूलाग्र कृती घडवून आणण्यासाठी मदत करु शकतो. परंतु शिक्षक हीच शिक्षणातील मुख्य समस्या आहे. असे कृष्णमूर्ती म्हणतात.

ख-या अर्थाने सुसंस्कृत आणि शांततामय अशी समाजरचना निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकावरच आहे हे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची फार मोठी संधी शिक्षकाला लाभलेली आहे.नवी समाजरचना जर आपल्याला निर्माण करावयाची असेल तर शिक्षणाकडे पैसे मिळवायचा धंदा म्हणून पाहणा-या व्यक्तींना शिक्षक म्हणून स्थान असता कामा नये.

खरा शिक्षक आंतरिक दृष्ट्या समृद्व असल्यामुळे, सत्तेच्या किंवा बाहय ऐश्वर्याच्या शोधात कधीच नसतो शिक्षणव्यवसायाकडे सत्ता, प्रतिष्ठा मिळविण्याचे साधन म्हणून तो पाहात नसल्यामुळे कुठल्याही समाजाचे वा सरकारचे वर्चस्व त्याच्या मनावर चालूच शकत नाही सुसंस्कृत समाजरचनेत अशा शिक्षंकाचे स्थान फार महत्वाचे आहे. कारण खरी संस्कृती तंत्रज्ञांच्या आणि तज्ज्ञांच्या कौशल्यावर उभी नसून ख-या शिक्षकांवरच उभी असते.

**ख-या शिक्षणाचा प्रारंभ**

ख-या शिक्षणाचा प्रारंभ हा शिक्षकांपासूनच होतो. म्हणूनच स्वत:च्या मनोविश्वाची घडण शिक्षकाला समजली पाहिजे. कुठल्याही वैचारिक साच्याची गुलामगिरी त्याने पत्करता कामा नये कारण आपल्या व्यक्तीत्वात जे आहे त्याच्याखेरीज दुसरा कुठलाही शिक्षक काय शिकवणार? अशा त-हेचे शिक्षण जर शिक्षकालाच मिळाले नसेल तर ज्या यांत्रिक पद्वतीच्या निर्जीव शिक्षणावर तो पोसला गेला तेच शिक्षण तो विद्यार्थ्यावर लादणार आणि म्हणूनच शिक्षणशास्त्रातील खरी समस्या, शिकणारे मूल हे नसून शिकवणारे शिक्षक आणि पालकही आहे. ख-या अर्थाने ज्याला शिक्षण म्हणता येईल ते आधी शिक्षकाला मिळाले पाहिजे.

ख-या शिक्षणात, कसा विचार करावा ते शिकायचे असते, कसला विचार करावा ते नव्हे. कसा विचार करावा हे जर कळत असले, विद्यार्थि हा मुक्त मनुष्य असतो. तो सिद्वांतापासून, भोळ्या समजुती, उत्सव, समारंभ यापासून मुक्त असतो. असा विद्यार्थि 'सत्यधर्म नेमका काय आहे' ते शोधून काढतो.

**ख-या शिक्षकाचा धर्म**

एका शिक्षकाशी झालेल्या चर्चेतून कृष्णमूर्तींनीं ख-या शिक्षकाचा धर्म कोणता आहे हे स्पष्ट केले आहे.त्यांच्या मतानुसार, माहिती देणे, ज्ञान देणे ही शिक्षकाची किमान कामे आहेत.कोणत्याही समाजातील मुलामुलींना आपला उदरनिर्वाह नीट करता यावा, यासाठी आणि चांगली समाजव्यवस्था घडविण्यास विद्यार्थ्याला साह्य करता यावे यासाठी, 'ज्ञान देणे' हा शिक्षकाच्या व्यवसायाचा एक भाग आहे. पण हा खरा शिक्षकधर्म नाही. खरा शिक्षकधर्म अधिकचे काही निश्चित काम असते, असे कृष्णमूर्तींना म्हणावयाचे आहे.

विद्यार्थ्यापुढे आपला आदर्श ठेवणे,हा शिक्षकाचा खरा धर्म होवू शकत नाही. कारण अनेक नेत्यांचा व थोर पुरुषांच्या आदर्शाच्या लांब मालिकेत आणखी एकाची भर टाकाल्यासारखे होईल. मार्गदर्शक, आदर्श पुरुष नेते यांच्याबददलचा जो मोहमय भ्रम विद्यार्थ्यांच्या मनात बसत असतो, तो नाहीसा करुन टाकणे,विद्यार्थ्याला सर्जनशील होण्यास, विमुक्त होण्यास साह्य करणे, आपण स्वत: व्यक्ति म्हणून वस्तुत: काय व कसे आहोत याचे यथार्थ आकलन करुन घेण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे, हाच शिक्षकाचा खरा धर्म आहे.मानवी मनाला संस्कारबद्व करीत राहणा-या धर्म,जात, वर्ण, भीती, इत्यादी सगळ्या प्रभावांपासून विद्यार्थ्याला सुज्ञपणे स्वत:ची मुक्तता करुन घेता यावी यासाठी त्याला मदत करता यावी हेच शिक्षकाचे कार्य आहे. कारण विद्यार्थी जर या रीतीने मुक्त झाला तरच त्याच्यामध्ये हिंसात्मक असंतोष किंवा भीती खदखदत राहणार नाही. आणि जीवनाला सखोलपणे व संपूर्णपणे सामोरे जाण्यास तो समर्थ होईल.

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



प्रत्येक विद्यार्थी ही अनन्यसाधारण अशी व्यक्ती असते. म्हणून तिची कुणाशीही तुलना करण्याजोगी नसते, या दृष्टीने जेव्हा शिक्षक विद्यार्थ्याकडे पाहू लागेल, तेव्हा कुठल्याही विशिष्ट पद्धतीची किंवा व्यवस्थेची त्याला गरजच उरणार नाही. त्यानंतर विद्यार्थ्याला संस्कारबद्ध करीत राहणारे जे बाह्य व आंतरिक प्रभाव असतात, त्यांच्या स्वरुपाचे आकलन करुन घेण्यास त्याला मदत करणे एवढेच शिक्षकाचे कार्य राहील. विद्यार्थ्याला एकदा असे आकलन झाले की, आपल्यापुढील गुंतागुंतीच्या जीवनाचा सामना तो सूज्ञतेने व निर्भयपणे करु शकेल आणि सगळया जीवनात आज जो गोंधळ माजलेला आहे, त्यात आणखी नव्या गोंधळाची भर तो घालणार नाही.

आणि कृष्णमूर्तींच्या मते, असा शिक्षकधर्म पाळणे ही शिक्षकाच्या शक्तीच्या पलीकडची अपेक्षा नाही. कारण ते म्हणतात, ''तुम्ही जर हे कार्य करण्यास असमर्थ असाल, तर मग शिक्षक म्हणून राहाताच का ? शिक्षकांच्या व्यवसायाकडे कुठल्याही पोटापाण्याच्या व्यवसायासारखाच एक व्यवसाय, याच दृष्टीने जर तुम्ही पाहात असाल, तर तुमचा प्रश्न सार्थ ठरेल, पण अस्सल शिक्षकाला अशक्य असे काहीच नाही, अशी माझी निश्चित धारणा आहे.''

## शिक्षणाचे मूलभूत कार्य

आपल्या जीवनातील प्रत्येक कृत्यामगच्या मनोव्यापाराचे स्वरुप समजून घेण्यास मदत करणे हे शिक्षकांचे कार्य आहे, यामुळेच मूलभूत असे परिवर्तन शक्य होईल. आपल्या मनाच्या स्वरुपाचे सूक्ष्म अवलोकन करणे, जीवनाच्या कुठल्याही एका अंगाला अवास्तव महत्व न देता, जीवनाचे समग्र दर्शन घडविणे, तसेच ''मी आणि माझे'' या द्वद्वांच्या पलीकडे नेणे हे शिक्षणाचे मूलभूत कार्य आहे.

वयाने लहान असतानांच जीवन म्हणजे एकूण आहे तरी काय हे शोधण्याचा प्रयत्न करायला नको का? असा प्रश्न उपस्थित करून कृष्णमुती म्हणतात, ''समस्यांना उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करणारी प्रज्ञा तुमच्या ठिकाणी विकसित करणे हे शिक्षणाचे खरे कार्य आहे.प्रज्ञा म्हणजे काय, तुम्हांला माहित आहे का? प्रज्ञा म्हणजे मोकळेपणे विचार करण्याचे, कोणत्याही ठराविक सूत्रांचे अनुकरण न करता खरोखर निर्भयपणाने विचार करण्याचे सामर्थ्य होय. त्यामुळे सत्य काय आहे, वास्तव काय आहे ते स्वत: शोधून काढण्यास तुम्ही सुरुवात करता.''

भयग्रस्तता प्रज्ञेचा व प्रज्ञावंत नाश करते. कोणत्याही प्रकारची महत्वाकांक्षा, मग ती पारमार्थिक असो किंवा ऐहिक असो, नेहमी चिंतेची, भयाची निर्मिती करते. म्हणूनच महत्वाकांक्षामुळे निर्मल, साध्या, सरळ, प्रज्ञावंत, सुज्ञ अशा मनाची निर्मिती होण्यास मदत होत नाही.

## शिक्षणापुढील मुख्य समस्या

व्यक्तीच्या मनात सुसंवाद कसा निर्माण करता येईल ही शिक्षणापुढील मुख्य समस्या आहे.

व्यक्तीच्या मनात मूलभूत परिवर्तन घडून येण्यापासूनच शिक्षणाला प्रारंभ होतो. धर्म, पंथ, वाद - कसलेही कारण असो - यासाठी युद्ध माजवणे चुकीचे आहे ही जाणीव शिक्षणाने, निर्माण केली पाहिजे.

ज्यामुळे प्रज्ञा जागृत होते, मनातील गोंधळ संपून सुंसंवाद निर्माण होतो तेच खरे शिक्षण. अशा त-हेचे शिक्षणच ख-या अर्थाने नवी संस्कृती, नवे जग निर्माण करु शकेल.

मुक्त आणि निर्भय मनाच्या व्यक्ती निर्माण करणे हा ख-या शिक्षणाचा हेतू आहे. अशा व्यक्तीच समाजजीवनात सहकार्य आणि सुसंवाद निर्माण करु शकतील.खरे शिक्षण आपल्या जिव्हाळयाचा विषय कोणता हे शोधून काढण्यास विद्यार्थ्यास मदत करील.

## विद्यार्थ्याची कर्तव्ये

''कर्तव्य'' हया शब्दांचा अर्थ काय आहे? कोणत्या बाबतीत कर्तव्य? एखादया राजकीय पुढा-याच्या मताप्रमाणे देशाच्या बाबतीतले कर्तव्य? तुमच्या आईवडीलांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या बाबतीतले कर्तव्य ? त्यांच्या आज्ञेत तुम्ही वागावे हे तुमचे कर्तव्य आहे,असे ते म्हणतात. आणि ते जे काही सांगतात ते त्यांच्या पूर्वपीठिकेप्रमाणे, रुढीप्रमाणे वगैरे संस्कारित झालेले असते.

आणि विदयार्थी म्हणजे काय? शाळेत जाऊन काही परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी पुस्तके वाचणारा मुलगा किंवा मुलगी म्हणजे विद्यार्थी का? की सदोदित शिकत असतो आणि म्हणून त्याचे शिक्षण कधी संपतच नाही, असा जो असतो तो खरा विद्यार्थी ? खरोखर जो मनुष्य केवळ एखादया विषयावर वाचन करतो, परीक्षा उत्तीर्ण होतो आणि नंतर सारे

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

सोडून देतो, तो विद्यार्थीच नव्हे. खरा विद्यार्थी वयाच्या केवळ वीस किंवा पंचवीस वर्षापर्यंतच नव्हे तर आयुष्यभर अभ्यास करीत असतो, शिकत असतो, चौकशी करीत असतो, शोध घेत असतो.

विद्यार्थी असणे म्हणजे केवळ सर्व वेळ शिकत असणे, आणि जोपर्यंत तुम्ही शिकत असता तोपर्यंत शिक्षक ही व्यक्ती अस्तित्वात नसते. कारण तुम्ही प्रत्येक गोष्टींपासून शिकत असता.वा-यावर भिरभिरणारे पान, नदीच्या काठाशी होणारी पाण्याची कुजबूज, पक्षांची आकाशातील उंच झेप, डोक्यावर जड ओझे घेऊन तुमच्या जवळून जाणारा गरीब माणूस, स्वत:ला जीवनासंबंधी सर्व काही माहित आहे, असे वाटणारे लोक या सा-यापासून तुम्ही शिकत असता. म्हणून खास शिक्षक असा कोणीही नसतो. आणि तुम्ही अनुयायीही नसता.तेव्हा विद्यार्थ्याचे कर्तव्य म्हणजे फक्त शिकणे होय.



****************************************

**प्रश्न :**

प्रश्न 2] खालीलपैकी कोणत्याही चारांवर प्रत्येकी 100 शब्दांत टीपा लिहा. [20]

1. 'ज्ञातापासून मुक्ति' ही संकल्पना.
2. कृष्णमूर्तींची स्वातंत्र्य संकल्पना.

प्रश्न 3] खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 200-250 शब्दात द्या. [30]

1. 'सत्य हा रस्ता नसलेला प्रदेश आहे' ही हे कृष्णमूर्तींचे म्हणणे स्पष्ट करा.
2. कृष्णमूर्तींची शिक्षणविषयक मते सांगा आणि चर्चा करा.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner